**पी.जी.ए. क्र. १९/२०१९**
**निशाणी क्रं.सी—१२**

**विरुध्द पक्षकारातर्फे ॲड श्री.ए. पी. चौगले यांचेमार्फत उलटतपास शपथेवर सुरु**

हे म्हणणे खरे आहे की, चौगुले इन्फ्रास्टक्चर प्रा. ली. ही कंपनी आहे. मी अर्जदार कंपनीचा कर्मचारी आहे असे दाखवणारा कोणताही कागद दाखल केला नाही. साक्ष देण्यासाठी मला अर्जदार कंपनीने ठराव अथवा अधिकारपत्र दिले असे दाखवणारा पुरावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या कंपनीत काम करणा—या कर्मचा—यांना प्रॉव्हिडंट फंड दिला जातो. अर्जदार कंपनीत २० ते २५ कामगार काम करतात. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार कंपनी ही महाराष्ट् शासनाच्या निविदा घेवून काम करणारी कंपनी आहे. हे म्हणणे खरे आहे की, निविदा प्रमाणे महाराष्ट्राच्या ज्या त्या जिल्हयात जावून अर्जदार कंपनी कर्मचा—यांमार्फत काम करते. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार कंपनीने कोल्हापूर जिल्हयात पाटबंधारे खात्याचे काम केले आहे.

मी कायमचा मडीलगेचा रहिवासी आहे. कामाला पुणे येथे असतो. हे म्हणणे खरे आहे की, मी पुणे येथे काम करतो असे दर्शवणारा पुरावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी कंपनीकडे मॅनेजर म्हणून काम करतो तसेच कंपनीने मला अधिकार दिले आहेत याबाबतचा पुरावा दाखल केला नाही. अर्जातील विप यांचा पत्ता बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, विपकडून महाराष्ट्र शासनाची सार्वजनीक बांधकाम विभागाची कामे कंत्राटी पध्दतीने केली जातात. हे म्हणणे खरे आहे की, विप कंपनीकडून निवीदा भरून कंत्राटीची कामे केली जातात. हे म्हणणे खरे नाही की, कामासाठी विप कंपनी हे स्वत:ची मशिनरी वापरते. हे म्हणणे खरे आहे की, प्रकल्पाचे काम स्थानीक पातळीवर चालते. हे म्हणणे खरे आहे की, प्रकल्पावरील मशिनरीची देखभाल कंपनीकडून केली जाते. हे म्हणणे खरे नाही की, विप कंपनीकडे १०० कामगार काम करतात. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार हा मॅकेनीकल फोरमन म्हणून काम करीत होता. अर्जदार हा दिनांक ०१/०१/१९९८ पासून काम करीत

होता याबाबत सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार हा विपकडे दिनांक ०४/११/२०१८ पर्यंत काम केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराने विपकडे सलग २० वर्षे काम केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदारास शेवटी दरमहा रू. २०,०००/— पगार होता. हे म्हणणे खरे आहे की, कामगारांना विप कंपनीतर्फे प्रॉव्हीडंट फंडचा लाभ दिला जातो. प्रत्येक कर्मचा—याला प्रॉव्हीडंट फंडचा स्वतंत्र कोड दिला आहे. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदारोन फॉर्म— आय पाठवले होते. फॉर्म—आय नंतर विपकडून पत्रव्यवहार केल्याचे माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराने विपचे कोल्हापूर विभागात काम केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, विपचे गारगोटी येथे पेट्रोल पंप आहे परंतु वर्कशॉप नाही. हे म्हणणे खरे नाही की, विपचे कोल्हापूर येथे वर्कशॉप नाही असे मी खोटे सांगत आहे. कर्मचा—यांच्या सोयीसाठी पुणे येथे बॅक ऑफ बरोडा येथे खाते काढले आहे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, विप कंपनीतर्फे कर्मचा—यांना उपदानाची रक्कम दिली जाते. हे म्हणणे खरे आहे की, विपकडे निश्चित किती कामगार काम करतात याबाबतचा पुरावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, औंध पुणे येथे विप कंपनीचे प्रशासकीय कार्यालय आहे तेथे कोणतेही वर्कशॉप नाही. हे म्हणणे खरे नाही की, शपथपत्रातील परिच्छेद क्र. ३ ते ५ मधील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार उपदान मिळण्यास पात्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

**सही/—**

कोल्हापूर.
दिनांकः— ०६/०३/२०२६

( के. बी. कामगौडा )
नियंत्रण अधिकारी,
कामगार न्यायालय क्र. २ कोल्हापूर.